# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/04/2023 (शनिवार) दुपार

---

## विनयभंग

पो.स्टे. अरोली:— दिनांक २८/०४/२०२३ चे १५/०० वा. ते १५/३० वा. चे सुमारास यातील अल्पवयीन फिर्यादी मुलगी वय १४ वर्ष ही टयुशनला जात असतांना यातील दोन्ही **आरोपी नामे— १) योगेश उत्तम बुरडे, वय ३० वर्ष २) मनिष बुरडे, वय १९ वर्ष, दोन्ही रा. तोंडली ता. मौदा जि. नागपुर** यांनी फिर्यादीचा पाठलाग करून तीचा हात व कमरेला पकडुन तु आमचे सोबत चाल असे म्हणुन तिचा विनयभंग केला व तिला जबरदस्तीने मोटर सायकलवर बसविण्याचा प्रयत्न करून त्या दोघांनी फिर्यादीला आम्ही तुला पाहुन घेवु असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करून तिला जिवे मारण्याची धमकी दिली असता तीने आपले वडीलाला सांगतो असे म्हटल्याने दोघेही त्यांचे कडे असलेल्या मोटरसायकलने भंडारा शहरात पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, २९४, ५०६, ३४ भादवि. सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळ हे खांबतलाव भंडारा जिल्हा भंडारा येथील असल्याने सदर गुन्हा मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचे मार्फतीने मा. पोलीस अधिक्षक नागपुर यांचे मार्फतीने पो.स्टे. भंडारा येथे वर्ग करण्यात आला आहे.

## चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत १० किमी अंतरावर कोंळबी शिवार येथे दिनांक २६/०४/२०२३ चे १८/०० वा. ते दिनांक २७/०४/२०२३ चे १२/०० वा. दरम्यान कोंळबी शिवारातील दोन गाळातील ॲल्युमीनीयम वायर १२० मिटर किंमती अंदाजे २८८०/— रूपयाचा तसेच चिचाळा शिवारातील पाच गाळातील दोन ॲल्युमीनीयम वायर ३०० मिटर किंमती अंदाजे ७२००/— रू. चा मुद्देमाल तसेच गाळामधील ॲल्युमीनीयम वायर १८० मिटर किंमती अंदाजे ४३२०/— रू. चा मुद्देमाल असा एकुण किंमती अंदाजे १४४००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा १७३२ ज्योति सेवतकर मो. नं. ९५५२५५६३४१ हे करीत आहे.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे मौदा :—** अंतर्गत ०७ किमी अंतरावर आजनगाव शिवार येथे दिनांक २८/०४/२०२३ चे ०२/३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोलीस स्टेशन मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की मारोडी कडून भेंडाळा गावाकडे रेतीची चोरटी वाहतुक टिप्परने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मारोडी कडून भेंडाळा गावाकडे पांढ.ऱ्या निळया रंगाचा टिप्पर क्र एम एच—३४ ए.बी —४२२७ चा चालक **आरोपी नामे—प्रकाश रूपचंद नेरकर, वय ३४ वर्ष, रा बेटाळा ता. मोहाडी जि. भंडारा** याने त्याच्या टिप्पर मध्ये अवैधरित्या विना परवाना चोरीची रेती वाहून नेतांना मिळुन आल्याने त्याच्या टिप्परमध्ये अंदाजे ५ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/—रू असा एकुण २५०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरून नेतांनी मिळून आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोशि शुभम ईश्वरकर ब. नं. ११२७ पोस्टे मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. प्रमोद चौधरी मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत वटेघाट एमआयडीसी बोरी येथे दिनांक २४/०४/२०२३ चे २२/०० वा. ते दि. २८/०४/२०२३ चे १३/०० वा. दरम्यान फिर्यादीची स्वतःची नट बोल्टची कंपनी असुन त्याचे मामा नामे मेघराज उबरकर याचे MIDC बुट्टीबोरी येथील वटेघाट या गावाला लागून असलेल्या गोडावून मध्ये फिर्यादीने नट बोल्ट तयार करण्या करीता मशीनरी पोर्ट आणुन ठेवले होते. फिर्यादीने कंपनीत जावुन बघितले असता मशिनरी सामानाची पाहणी केली असता फिर्यादीला १) वायरड्रॉं चैन अंदाजे किंमती ५०००/— रू. २) लिफ्टिंग मशीनचा हायड्रोलिक पम्प अंदाजे किंमती १०,०००/— रू. ३) हेडर कॉईल स्टॅड अंदाजे किंमती १०,०००/—रू असा एकूण २५,०००/—रू. मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवून गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रजत अरून झाडे वय २९ वर्ष, रा. रघुकूल अपोर्टमेट उज्वल नगर नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोनि श्री महादेव आचरेकर मो. क्र. ८३८००७२२११ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**